दुष्काळग्रस्त आटपाडीतून थेट दिल्ली दरबारापर्यंत पोहोचलेले मुंबईकर राम नाईक. या प्रवासात यशाचे शिखर गाठले, अपयश पचविले, प्रसंगी मृत्यूशीही दोन हात केले. जीवन प्रवासातले हे सर्व टप्पे पार करताना 'इदं न मम्, राष्ट्राय स्वाहा' हा सतत कानात घुमणारा गोळवलकर गुरुजींचा मंत्रघोष बळ देतो असं मानणा-या राम नाईक यांची ही जीवन गाथा......

वयाच्या पंचाहत्तरीनंतर आता कोण मला कसलं पारितोषिक देऊ इच्छितयं अशा कुतुहलानेच मी ख्यातकीर्त कर्करोगतज्ञ डॉ. सुरेश आडवाणी यांची ईमेल वाचली. सुप्रसिद्ध अभिनेत्री स्व. नर्गीस यांच्या स्मरणार्थ 'कर्करोगावर जिद्दीने मात करुन त्यानंतर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविलेले व्यक्तिमत्त्व' म्हणून मुंबईत कर्करोगासंदर्भात काम करणारी 'हेल्पिंग हँड' संस्था मला सन्मानित करु इच्छिते हे सांगणारी ही ईमेल होती. खरंच की! मीही एकेकाळी कर्करोगग्रस्त होतो! त्या दुर्धर आजारावर मात केल्यानंतर उर्वरित आयुष्य हा मिळालेला बोनस आहे, तो समाजासाठी वापरेन असा संकल्प करीत 'पुनश्च हरि ओम्' केल्याला आता 18 वर्षे झाली. याच अठरा वर्षात कर्तृत्वाची परिसीमा गाठली तसेच हातातले श्रेय जाताना बघितले. सिंहावलोकन करताना अनेकदा वाटतं जणू या एकाच आयुष्यात मी दोन जन्म जगलो.

## वडिलांची तालीम

परिपूर्ण जीवन जगताना सर्वात आवश्यक गोष्ट म्हणजे खणखणीत तब्येत. मार्च ते सप्टेंबर 1994 हा कर्करोगाने ग्रासलेला काळ म्हणजे आता मला माझ्या आरोग्याला जणू नजर लागू नये म्हणून नियतीने लावलेले गालबोट होते असे वाटते. उर्वरित आयुष्यात मला खरोखर उत्तम आरोग्य लाभले. अर्थात त्याचे श्रेय मला औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना द्यावेसे वाटते. माझा जन्म अक्षय्य तृतीयेचा-16 एप्रिल 1934 ला सांगलीत आजोळी झाला. बालपण गेलं कायम दुष्काळी असलेल्या आटपाडी गावात. वडील द्विपदवीधर असले तरी ब्रिटीशांची नोकरी नको या भूमिकेतून औंध संस्थानाच्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून नोकरी करीत. औंध संस्थानाच्या शाळांमध्ये दररोज सूर्यनमस्कार व्हावेत असा पंतप्रतिनिधींचा आदेश. कडक शिस्तीच्या माझ्या वडिलांनी या आदेशाचे काटेकोर पालन करुन निरोगी विद्यार्थी घडविले. शाळेत अभ्यासाचे तास सुरु होण्याआधी सूर्यनमस्कार आणि जो नमस्कार घालणार नाही त्याला कडक शिक्षा! पण या सक्तीतून व्यायामाची कधी गोडी लागली ते कळले नाही आणि आयुष्यभर पुरेल एवढी शारीरिक क्षमता आली ती वेगळीच.

माझे वडील नाईक मास्तर यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली. मी विद्यार्थी आणि मुलगाही, माझी झोळी त्यांच्या संस्कारांनी ओतप्रोत भरली. महाराष्ट्राचे वाल्मिकी ग. दि. माडगूळकर, त्यांचे बंधू व्यंकटेश माडगूळकर, सुप्रसिद्ध लेखक शंकर खरात यासारख्या साहित्य क्षेत्रातील दिग्गज विद्यार्थ्यांनी वेळोवेळी त्यांच्या नाईक मास्तरांचा अर्थात माझ्या अण्णांचा कृतज्ञतेने उल्लेख केला. मला तर अण्णांनीच घडविले. हल्लीसारखे बाप-मुलातले मित्रत्वाचे नाते आमच्यात नव्हते. पण अण्णांच्या करड्या शिस्तीत आमच्या शिक्षणाची कळकळच जाणवे. स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी मी आठवीत होतो. त्यावेळी संस्थाने खालसा झाली. औंध संस्थानातील नोकरीतून अण्णा निवृत्त झाले. पंढरपूरच्या कवठेकर शाळेत त्यांनी दुसरी नोकरी घेतली. अण्णा केवळ पेशाने शिक्षक नव्हते तर शिक्षणाची दृष्टी त्यांच्याकडे होती. अभ्यासाच्या महत्त्वाच्या वर्षांमध्ये त्यांच्या जीवनातल्या अस्थिरतेचा माझ्यावर परिणाम नको म्हणून मला आणि माझ्याबरोबर राहण्याचा हट्ट करणा-या माझ्या धाकट्या भावाला - बिंदाला अशा दोघांनाच आटपाडीत ठेवून अण्णा व मामी (आम्ही आईला मामी म्हणायचो) पंढरपूरला गेले. मनावर त्या दोघांनी केवढा दगड ठेवला असेल याची नेमकी जाणीव स्वतः बाप झाल्यावर झाली. बरं वा-यावर सोडून गेले नाहीत. अण्णांची घारीपेक्षा तीक्ष्ण नजर आहे, आपला श्वास-उच्छ्वासही त्यांना कळेल असं त्या बालवयात वाटे. कठोर शिस्तीच्या अण्णांनी माणसं विलक्षण जोडली होती. आमचं घर गावाबाहेर शाळेच्याच आवारात. शाळेसाठी आणि आमच्या घरगुती वापरासाठी विहीर होती. स्वातंत्र्यपूर्व काळात सुधारकांची टोपी न घालता अण्णा त्या विहीरीवर बाजूच्याच गावकुसाबाहेर राहाणा-या रामोशी, वडारी आणि मांग समाजातल्या लोकांना पाणी भरु द्यायचे. आता लक्षात येतंय की या त्यांच्या स्वभावामुळेच गांधीहत्येनंतरही गावातलं आमचं एकच घर ब्राम्हणाचं असूनही शाबूत का राहिलं. माझा शाळासोबती चिंतू माळी याच्या शेतातल्या झोपडीत लपून आम्ही सर्वांनी ती रात्र घालविली. याच चिंतूच्या गरीब आईकडे आम्हां भावंडांच्या जेवणाची सोय लावून अण्णा-मामी दुस-या गावी गेले. वर्गात सतत पहिला क्रमांक टिकवून आम्ही भावांनी त्यांच्या विश्वासाला तडा जावू दिला नाही.

शाळकरी जीवनातील अनेक गोष्टींतून मी खूप शिकलो. मला आठवतयं, एकदा ताईला कसलं तरी बक्षिस म्हणून सुंदर काचा असलेलं एक कपाट (शोकेस) मिळालं. ताई तर बेहद्द खूष होती. सायंकाळी अण्णा घरी आल्यावर त्यांनीही शाबासकी दिली. जेवताना मात्र अण्णांनी ताईला सुचविलं की प्रयोग शाळेत अशा शोकेसची नितांत गरज आहे. त्यात प्रयोगाचे सामान बाहेरुन दिसेल पण सुरक्षित



जीवघेण्या अपघातानंतर रुग्णालयात भेटायला आलेले मा. बाळासाहेब देवरसजी